# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नागपूर जिल्ह्यातील गोंडखैरी (ता.कळमेश्वर, जि.गोंडखैरी) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१) ३९३११ (०१-०४-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजे गोंडखैरी (ता.कळमेश्वर, जि.गोंडखैरी) येथील जिल्हा परिषद शाळेतील ७ वर्गातून १४९ विद्यार्थी शिक्षण घेत असून केवळ दोनच शिक्षक कार्यरत असल्याची बाब दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या लक्षात घेता पहिली ते पाचवी साठी पाच शिक्षक व सहावी ते सातवी साठी दोन शिक्षक तसेच एक मुख्याध्यापक अशी एकूण आठ पदे मंजूर असतानाही पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१), (२) व (३) आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मिठी नदीच्या धर्तीवर मुंबईतील पोईसर तसेच दहिसर नदीचे पुर्नरुज्जीवन करण्याबाबत.**

**(२) ४९६०२ (२३-०१-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोईसर व दहिसर नदीच्या संवर्धनाचे प्रयत्न सुरु असताना नदीकाठच्या परिसरातील जनावरांचे गोठे व अतिक्रमणे झाल्याने नदीचे पाणी प्रदूषित होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच आसपासच्या गोठ्यामधून मोठ्या प्रमाणात शेणयुक्त पाणी व नदीलगतच्या झोपडयातील गाळ नद्यांमध्ये येत असल्यामुळे प्रदुषणाचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नदीतील प्रदूषणात सातत्याने वाढ होत असून पावसाळयात पाणी तुंबण्याचे प्रकार घडत असून प्रशासन त्याकडे गांर्भियाने लक्ष देत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदीच्या पुर्नरुज्जीवनाकरिता मोठया प्रमाणात निधी खर्च केला जात

असून मुंबईतील महत्वाच्या असलेल्या पोईसर व दहिसर नदीच्या पुर्नरुज्जीवनाकरिता शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना केल्या वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील पोईसर व दहिसर या नद्या मुख्यत्वे हंगामी वाहणाऱ्या आहेत. पावसाळ्या व्यतिरीक्त इतर हंगामात मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून निर्गत होणारे अप्रक्रियाकृत सांडपाणी व नदी लगत परिसरातील गोठ्यांमधून बाहेर पडणारे शेणयुक्त पाणी पोईसर व दहिसर नदीपात्रात जात असल्याचे दिसून येते.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दहिसर व पोईसर नद्यांचे पुनरूज्जीवन करण्याचे प्रकल्प हाती घेण्यात आले असून सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ,मालेगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक ) माध्यमिक शिक्षक संघ व टीडीएफ मालेगांव मुख्याध्यापक यांच्या मागण्यांबाबत**

**(३) ५०२१४ (१८-०१-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ,मालेगांव तालुका माध्यमिक शिक्षक संघ व टीडीएफ मालेगांव मुख्याध्यापक संघ यांच्या वतीने विविध मागण्यांकरिता माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान अपर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर मागण्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.
रेणुका देवी शिक्षण प्रसारक मंडळ कुकाणे तालुका मालेगाव या संस्थेत संस्थाचालकानी भ्रष्टाचाराचा अड्डा मांडलेला आहे,संस्थेचे सर्व कागदपत्र बनावट,बोगस व भ्रष्टाचारी मार्गाने तयार केलेले आहे. या संस्थेच्या शाळांच्या, कनिष्ठ महाविद्यालयाच्या मान्यता घेताना संस्थेने शासनाची दिशाभूल करून खोटी व बनावट माहिती पुरविलेली आहे. ५ वी ते १० वी सेमी इंग्रजीचे वर्ग एकाच वर्षात सुरु केलेले आहेत. १७ नंबर तसेच आयसोलेटेड विद्यार्थी बसविले जातात. सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती मुख्याध्यापकांनी हडप केलेल्या आहेत. अनुदानित शाळांत संस्था चालकाची मुले,सुना व मुली नोकरीस आहेत. संस्थेतील कर्मचाऱ्यांचा आर्थिक, मानसिक व शारीरिक छळ केला जातो. विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीररित्या फी जमा केली जाते. संस्थाचालकांकडे, त्यांच्या दोन्ही मुलांकडे व त्यांच्या कुटुंबियांकडे असलेल्या करोडो रुपयांची बेनामी संपत्तीची सविस्तर चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.
(३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), नाशिक यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचारी मानधन वाढीपासून वंचित असल्याबाबत**

**(४) ५२५८५ (१८-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.तान्हाजी मुटकुळे**

**(हिंगोली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समग्र शिक्षा योजनेअंतर्गत विषय साधन व्यक्ती, विशेष साधन व्यक्ती कार्यक्रम अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी जिल्हा समन्वयक (समावेशित शिक्षण), जिल्हा समन्वयक (मुलींचे शिक्षण) अशा विविध पदांवर कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समग्र शिक्षा योजने अंतर्गत विविध पदांवर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात १० टक्के मानधन वाढ देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समग्र शिक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मागील चार वर्षापासून मानधन वाढीपासून वंचित राहावे लागत असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाच्या कोणत्याही सुविधा लागू नसल्याने मानधनाच्या रकमेतूनच फिरती शाळा भेटींचा खर्च करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मागील चार वर्षापासून कुठलेही मानधन वाढ झाली नसल्याने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यकारी समितीने शासनाकडे दहा टक्के मानधन वाढीचा प्रस्ताव सादर केला असून सदर प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या पुर्वाश्रमीच्या (Erstwhile) योजना एकत्र करून शालेय शिक्षणासाठी एकात्मिक योजना म्हणून समग्र शिक्षा ही केंद्र पुरस्कृत योजना सन २०१८-१९ पासून भारत सरकारने सुरू केली आहे.

सन २०१७-१८ पासून करार कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या ठोक मानधनावर ५ टक्के वाढ देण्यात आली आहे. तथापि, सन २०१९-२० पासून केंद्र शासनाने कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ दिली नसल्याने ५ टक्के याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार सन २०२१-२२पर्यंत करार कर्मचाऱ्यांना मानधन अदा करण्यात येत आहे.

समग्र शिक्षा योजने अंतर्गत विविध पदांवर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्तावावर शासनाने मंजूरी दिलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.पुणे) तालुक्यातील शाळांमधील मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक, उपशिक्षक, केंद्रप्रमुखांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) ५७२६४ (२४-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील शाळांमधील मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक, उपशिक्षक, केंद्रप्रमुखांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे भरण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) आयबीपीएस कंपनीमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून, त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यास्तव सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

---

**शिक्षणाचा अधिकार (आरटीई) फाउंडेशन च्या विविध मागण्यांबाबत**

**(६) ५७६८२ (२४-०४-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने निर्धारित केलेला प्रति विद्यार्थी एकतीस हजार पाचशे एकवीस रुपये निधी सर्व शाळांना मिळावा व अन्य मागण्यासाठी आर टी ई फाउंडेशन तर्फे नागपूर हिवाळी अधिवेशन दरम्यान मोर्चा काढण्यात आल्याचे माहे डिसेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, विनाअनुदानित/अंशतः अनुदानित/त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान देण्यासाठी मंत्रिमंडळाने मंजूर केलेला ११६० कोटी व वाढीव ९४ कोटी रुपयाचा निधी मंजूर करून शासन निर्णय निर्गमित करावा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०-२०-३० ची आश्वासित प्रगती योजना लागू करणे, शंभर टक्के अनुदान प्राप्त उच्च माध्यमिक शाळांतील वाढीव पदाला शासन मान्यता प्रदान करणे, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरणे या विविध मागण्यांचे निवेदन शालेय शिक्षण मंत्री यांना दिले आहे हे, ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२३-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, अंशत: अनुदानित पदांवर व तुकडयांवर दि.१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अभ्यास करण्यासाठी

दि.२४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दि.०३ जुलै, २०२० रोजी अहवाल शासनास सादर केला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा विचार करता सध्याच्या धोरणात बदल करण्याची आवश्यकता दिसत नसल्याचे नमूद करुन समितीने राज्य शासनावर येणारा आर्थिक भार विचारात घेता शासन स्तरावर योग्य निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस संयुक्त समितीने केली आहे. संयुक्त समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने दि.१८/१२/२०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सम्यक विचार समिती गठीत करण्यात आली होती. तसेच, श्री.विशाल सोलंकी, अध्यक्ष, सम्यक विचार समिती तथा आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी समितीचा अहवाल सादर केला असून तो विचाराधीन आहे. मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर मधील दि.३०/०४/२०१९ रोजीच्या आदेशा विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात (सिव्हील) डायरी क्र.(एस) १८४०/२०२२ दाखल विशेष अनुमती याचिका विलंबाच्या कारणास्तव दि.११/०२/२०२२ रोजी खारीज करण्यात आली आहे. तसेच, श्री.प्रदिप महल्ले व इतर यांनी दाखल केलेली विशेष अनुमती याचिका न्यायप्रविष्ठ आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाच्या दि.३०/०४/२०१९ च्या आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही.तथापि, शासनाचे धोरण सर्व प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना समान स्वरुपात लागू होत असल्याने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून याबाबत वेगळे धोरण अवलंबिणे योग्य होणार नाही. तथापि, यासंदर्भात संबंधित विभागांसमवेत बैठका घेण्यात येत आहेत. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्त उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा ४, दिनांक ३१ मार्च, २०२३ निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणीसाठीचा राज्यातील जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक /उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदान मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय क्र. अंनियो-२०२३/प्र.क्र.२८/टिएनटी-६, दि. १४ जून २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

मा.मंत्रीमंडळाच्या दि.१३.१२.२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना, यापूर्वी २० टक्के/४० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांना वाढीव २० टक्के अनुदानाचा टप्पा देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, राज्यातील अघोषित शाळा/नैसर्गिक तुकडयांना सरसकट २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.यासाठी आवश्यक प्रतिवर्षी रु.११६० कोटीच्या खर्चास मान्यता दिल्याबाबतचा शासन निर्णय दि.०६.०२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.तसेच,यावरील खर्च भागविण्यासाठी सन २०२२ च्या हिवाळी अधिवेशनात रु.२७५ कोटीची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आलेली आहे.

शिक्षकांसाठी १०,२०,३० ची आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतची मंत्रीमंडळ टिप्पणीस वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी २४ वर्षानंतरचा दुसरा लाभ लागू करण्यासाठीच्या मंत्रीमंडळ टिप्पणीस वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात येणार आहेत.

राज्यातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३-०४ ते सन २०१८-१९ मधील शिक्षकांच्या वाढीव पदांना मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. त्याबाबतच्या प्रस्तावाची नस्ती अभिप्रायार्थ वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेली आहे.

आयबीपीएस कंपनीमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द झालेला असून त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार राज्यात पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्हयातील आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता मेमरी कार्ड खरेदी करण्यात आल्याबाबत

**(७) ५८७६७ (२४-०४-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील आठवी ते दहावीच्या सुमारे साडेचार हजार विद्यार्थ्यांकरिता सुमारे अडीच कोटींची मेमरी कार्ड खरेदी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खरेदी करण्यात आलेले मेमरी कार्डाची किंमत पाचशे रुपयांपेक्षा जास्त नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२९-११-२०२३) :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र अंतर्गत प्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्रातील इयत्ता १ली ते दहावी मधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी ई-लर्निग सुविधा विना इंटरनेट उपलब्ध करून देण्यासाठी २५४.८२ लक्ष मेमरी कार्ड खरेदी करण्यात आलेली आहेत, सदर खरेदी Gems पोर्टलवरून उपलब्ध असलेल्या दराप्रमाणे करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शहापूर तालुक्यातील वाशाळा पंचक्रोशीतील टोकरखांड, फुगाळे या दोन गावांच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(८) ५८७८९ (२७-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील वाशाळा पंचक्रोशीतील टोकरखांड, फुगाळे या दोन गावांच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याप्रकरणी शहापूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाकडे स्थानिकांनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रार करुनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीतआहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुसार रस्त्याच्या दुरुस्ती करण्याबाबत तसेच संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सदरबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळच्या नियुक्त कंत्राटदारामधून समृध्दी महामार्गाच्या कामासाठी वापरण्यात आलेले रस्ते वेळोवेळी कंत्राटदारामार्फत दुरुस्त करण्यात आले आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाडा-खर्डी (जि.ठाणे) या राज्य महामार्गांची झालेली दुरवस्था

**(९) ५९०८१ (२५-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा-खर्डी (जि.ठाणे) या राज्य महामार्गांची दुरवस्था झाली असून या रस्त्यांची आठ दिवसांत दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्थानिकांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गांची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२४) :** (१) वाडा ते खर्डी हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचा रस्ता आहे.सदर रस्त्यावर वाडा ते टेंभा (बेलवड) ही लांबी देखभाल व दुरुस्तीकरीता सा.बा.विभागाकडे आहे. टेंभा (बेलवड) ते खर्डी ही लांबी देखभाल व दुरुस्तीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे आहे.

वाडा-टेंभा (बेलवड) या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिकांनी आंदोलन केले होते, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्यावर पूरहानी दूरुस्ती कार्यक्रमांतर्गत रक्कम रु.४.२८ कोटी चे मंजूर काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर रस्त्यावर ९.५ कि.मी लांबीत रक्कम रु.६.७५ कोटी ची डांबरीकरणाची कामे मंजूर आहेत. या पैकी ४.५ कि.मी. लांबीतील डांबरीकरणाची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ५ कि.मी लांबीतील प्रगतीपथावरील कामे मार्च २०२४ पर्यन्त पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औसा-तुळजापूर (क्र.३६१) राष्ट्रीय महामार्गावरील टाका पाटी (ता.औसा) येथे अपघात प्रवण क्षेत्र निर्माण झाल्याबाबत**

**(१०) ५९२९५ (२५-०४-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील (क्र. ३६१) टाका पाटी (ता.औसा) येथे प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना न केल्यामुळे अपघात प्रवण क्षेत्र निर्माण होऊन अपघात होत असल्याने नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघात प्रवण क्षेत्रात आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यासंबंधी पोलीस प्रशासनाने महामार्ग प्राधिकरण व बांधकाम विभागाला पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करुन यास दिरंगाई करणारे अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०१-०२-२०२४) :** (१) तुळजापूर-औसा राष्ट्रीय महामार्गावरील (क्र.३६१) कि.मी.०/० ते कि.मी.५५.८३५ या लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. या महामार्गावरील कि.मी.३८.७८८ या ठिकाणी अपघात होत असल्याने नागरिकांनी दि.६.६.२०२२ रोजी रास्ता रोको आंदोलन केले होते.
(२) अपघात प्रवण क्षेत्रात आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यासंबंधी पोलीस प्रशासनाने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणास कळविले होते.
(३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत अपघात स्थळाची पाहणी करुन अपघात टाळण्यासाठी आवश्यक रस्ता सुरक्षा उपाययोजना त्वरीत करण्यासाठी सवलतदारास तात्काळ सूचना देण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन सवलतदाराकडून अपघातप्रवण ठिकाणी रस्ते सुरक्षा उपाययोजनांचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व रेशन दुकानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील महिलांना सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) ६०६७८ (२७-०४-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे ऑफ इंडियाने १५ ते २४ वयोगटातील महिलांचे केलेल्या सर्वेक्षणात मासिक पाळीच्या संरक्षणासाठी सॅनेटरी पॅड ऐवजी कापड वापरत असल्याचे निदर्शनास आल्याने आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना राज्यातील सर्व रेशन दुकानाच्या माध्यमातून सॅनेटरी पॅड उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ नोव्हेंबर,२०२२ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांना निवेदनाव्दारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात मोठया प्रमाणात पाळी दरम्यान सॅनेटरी पॅड वापरण्यास अनेक महिला असमर्थ ठरत असल्याने सर्व महिलांना रेशन दुकानाच्या माध्यमातूर निशुल्क सॅनेटरी नैपकीन उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कोणता धोरणात्मक आराखडा तयार करणार आहे काय,

(३) असल्यास,उक्त आराखडयानुसार राज्यातील सर्व महिलांना रेशन दुकानाच्या माध्यमातून सर्वत्र सॅनेटरी पॅड उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती आर्थिक तरतूद केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२१-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ग्रामविकास विभागाच्या अस्मिता योजनेची व्याप्ती, स्वरुप, पुरवठादार निवड व वाहतूक इ. मध्ये सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. यासंदर्भात शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथील रस्त्यांच्या कामांबाबत

**(१२) ६११११ (२५-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विहिगांव-दापूर-अजनुप-शिरोळे ते रामा-३ प्रजिमा-५१ आणि राममा क्र.३ घाटणेदेवी कातकरवाडी-बेलमपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) व इतर रस्त्यांच्या कामासंदर्भात सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनात कपात सूचनेला दिलेल्या निवेदनात सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याचे नमूद करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनानुसार सदर काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरील कामाची निविदा केव्हापर्यंत काढण्यात येणार आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (११-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.०१/०१/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये ''यू-डायस प्लस''ची माहिती भरलेली नसल्याबाबत

**(१३) ६२२२४ (२६-०४-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५ हजार ८८२ शाळांनी माहे डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत ''यू-डायस प्लस''ची माहिती भरलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उक्त माहिती न भरणाऱ्या शाळांवर शासनाने कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यभरातील शाळेतील मुलींना सॅनिटरी नॅपकिन पुरविण्याबाबत

**(१४) ६२९९५ (२६-०४-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळेतील मुलींच्या आरोग्य व सुरक्षिततेच्यादृष्टीने सॅनिटरी नॅपकिनच्या पुरवठ्याबाबत दर्जा हा सांभाळायलाच हवा असे निरीक्षण नोंदवत मा.मुंबई उच्च न्यायालयाने राज्य शासनाने निविदाप्रक्रियेत घातलेल्या अटींना आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदा भरणाऱ्या कंपन्यांना किमान तीन वर्षांचा अनुभव व वार्षिक उलाढाल किमान १२ कोटी रुपयांची असणे बंधनकारक असलेल्या या अटींना आव्हान दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यावर सदर निर्णय दिला असून 'राज्यभरातील नऊ हजार ९४० सरकारी शाळांमध्ये विद्यार्थिनींसाठी स्वच्छ सॅनिटरी नॅपकिन पुरवण्याबाबत निविदा मागवण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निविदा प्रक्रीयेच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-१२-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) Sanitary Pads,Vending Machine and Incinerators चा पुरवठा करण्याकरीता GeM प्रणालीमार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेन्वये राज्यामध्ये एकूण ९,९४० शाळांमधील विद्यार्थीनीकरीता (८,८४९ उच्च प्राथमिक व १,४९१ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना) एकूण रू.२९.८२ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर मंजूरीच्या अनुषंगाने निवड करण्यात आलेल्या पुरवठादाराकडून पुरवठा विहीत कालावधीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दे.राजा (जि.बुलढाणा) येथे सन २०२१-२२ या कालावधीत सहकारी शेतकरी खरेदी विक्री संस्था यांनी खरेदीमध्ये केलेल्या अपहाराबाबत

**(१५) ६३६८८ (२१-०४-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दे.राजा (जि.बुलढाणा) येथे २०२१-२२ या कालावधीत सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था यांनी खरेदीमध्ये अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अपहार केल्याप्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांना दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड यांनी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पत्रानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-१२-२०२३) :** (१) होय.
यासंदर्भात सहायक निबंधक सहकारी संस्था देऊळगाव राजा यांचेकडे तक्रार प्राप्त झाली.

(२) होय.

(३) होय,

यासंदर्भात सरव्यवस्थापक (नाफेड खरेदी) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित संस्थेवर कार्यवाही करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. देऊळगांवराजा यांना दिनांक २४.०२.२०२३ च्या पत्राने सूचना दिल्या आहेत तसेच सद्य:स्थितीत संस्थेची महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० चे कलम-८३ नुसार चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील परवाना प्राप्त रेशनिंग दुकानदार आणि बचत गट यांचे परवाने रद्द करण्याबाबत**

**(१६) ६४५७१ (३०-०८-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परवाना प्राप्त रेशनिंग दुकानदार आणि बचत गट स्वत: वितरण केंद्र चालवित नाहीत त्यांचे परवाने प्रत्यक्ष पाहणी करून रद्द करण्याची लेखी मागणी अध्यक्षा, जागृत ग्राहक संरक्षण मंच यांनी दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखी मागणीच्या अनुषंगाने पाहणी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२१-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पत्राच्या अनुषंगाने शासन पत्र क्र. तक्रार २५२३/प्र.क्र. ५२/नापु ३१. दि. २९.१२.२०२३ अन्वये राज्यातील सर्व उपायुक्त (पुरवठा), सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी व नियंत्रक, शिधा वाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरसाड नाका वज्रेश्वरी-अंबाडी-वाशिंद रस्त्याचे चौपदरीकरण करणेबाबत**

**(१७) ६४६४६ (३०-०८-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, भिंवडी व शहापूर तालुक्यासह मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्ग व मुंबई नाशिक राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा शिरसाड नाका-वज्रेश्वरी-अंबाडी-वाशिंद हा एक महत्त्वाचा रस्ता असल्याने स्थानिकांकडून सदर रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची वारंवार मागणी होत असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे चौपदरीकरण करण्यासाठी भूसंपादनास मंजूरी मिळण्याकरिता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२४) :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन आढळून येत नाही.

(२) व (३) हायब्रिड ॲन्युईटी योजनेअंतर्गत सदर रस्त्याची सुधारणा करणेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मंजूर आहे. सद्य:स्थितीत सदर अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

---

**चांदवड -लासलगाव-विंचूर-नांदूरशिंगोटे तसेच पिंपळस ते येवला (जि.नाशिक) रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१८) ६४८६८ (३०-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड-लासलगाव-विंचूर-नांदूरशिंगोटे (जि.नाशिक) या रस्त्यावर अपघात होत असल्याने सदर रस्त्याचे हायब्रीड ॲन्युटी मॉडेल या योजनेतून चौपदरीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पिंपळस ते येवला (जि.नाशिक) चौपदरी रस्त्याच्या सुधारणेच्या कामाचा हायब्रीड ॲन्युटी मॉडेल या योजनेतून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून या कामाला प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ जून २०२३ रोजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२४) :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) चांदवड-लासलगांव-विंचूर या रस्त्याचे काम हायब्रीड ॲन्युटी या योजनेतून करण्यास निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल योजनेअंतर्गत नाशिक निफाड येवला औरंगाबाद रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मंजूर आहे. सद्य:स्थितीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

**मंजूर खर्डी-परळी-उज्जैनी-साप-जव्हार रा.मा. ७७ राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ६४९३१ (३१-०८-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर/ठाणे जिल्ह्यातील खर्डी-परळी-उज्जैनी-साप-जव्हार रा.मा. ७७ वरील परळी ते वैतरणा दरम्यान वैतरणा नदीवरील पुलाच्या बांधकामाकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी रुपये १५ कोटीचा निधी मंजूर करुन घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलामुळे शहापूर व वाडा हे दोन तालुके खर्डी रेल्वे स्थानकाशी जोडले जावून येथील स्थानिक आदिवासींना रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या ३/२ चा प्रस्ताव ग्रामपंचायतीने वन विभागाकडे देवून अनेक वर्षे उलटूनही वन विभागाचे अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पुलाचे काम लवकरात लवकर पुर्ण करणे तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२४) :** (१) सदर रस्त्यावर सा.क्र. कि.मी. १५/५०० येथे नवीन पुल बांधणीकरिता रक्कम रु. १५ कोटीचे काम मार्च,२०२३ मध्ये मंजूर करण्यात आले आहे. हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर पुलाचे काम कार्यान्वयीत करणेकरिता आवश्यक सर्वसाधारण मांडणी नकाशा, संकल्पने व विविध विभागाच्या परवानग्या प्राप्त करुन, अंदाजपत्रके व निविदा प्रक्रीया पूर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियाजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांना इंटरनेटसह सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२०) ६५०८७ (२९-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमधून विद्यार्थी व शिक्षक यांची दैनंदिन उपस्थिती ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्याची सक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी इंटरनेटसह अन्य आवश्यक सोयी-सुविधा शासनाने उपलब्ध करुन देणे आवश्यक असतांनाही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने ऑनलाईन दैनंदिन उपस्थितीसाठी आवश्यक सोयी-सुविधा पुरवाव्यात त्यानंतरच याबाबतची सक्ती करावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने जिल्हा परिषद भवनासमोर माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त जिल्हापरिषद शाळांना इंटरनेटसह अन्य आवश्यक सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (३०-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यासाठी पथदर्शी कार्यक्रम म्हणून विद्या समिक्षा केंद्रामार्फत विद्यार्थी व शिक्षक यांची दैनंदिन उपस्थिती नोंदविण्यासाठी BOT Application ची प्रायोगिक स्तरावर अंमलबजावणी करण्याकरीता दि. ०६.०४.२०२३ ते दि. २१.०४.२०२३ या कालावधी दरम्यान कार्यक्रम राबविण्यात आला. तद्नंतर विद्यार्थ्यांना उन्हाळी सुटी जाहीर झाल्यानंतर ऑनलाईन उपस्थिती बंद झाली. याबाबत शिक्षकांनी माहे एप्रिल २०२३ दरम्यान आंदोलन केले असून, विद्यार्थी व शिक्षक यांची दैनंदिन ऑनलाईन उपस्थिती सक्तीची करण्यात आली नसून, पथदर्शी प्रकल्प असल्याचे त्यांना सांगण्यात आले. सदर कार्यक्रमास ज्या ठिकाणी सुविधा उपलब्ध आहेत, त्या शाळांनी प्रतिसाद दिला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील अणुस्करा घाटमार्ग निर्धोक करण्याबाबत**

**(२१) ६५१९७ (३०-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (ता.रत्नागिरी) तालुक्यातील अणुस्करा घाटमार्गात गत अनेक वर्षात सातत्याने पावसाळ्यात अनेक ठिकाणी दरड आणि मातीसह दगड पडण्याचे प्रकार घडत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घाटमार्गाच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असले तरीही वळणाच्या ठिकाणी असलेले अरुंद रस्ते आणि धोकादायक दरडीमुळे हा घाटमार्ग पावसाळ्यात प्रवासासाठी असुरक्षित ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मार्गास प्रवासी प्राधान्य देत असल्यामुळे शासनाने हा घाटमार्ग कायमस्वरुपी निर्धोक होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०२-२०२४) :** (१) व (२) सन-२०२२ मध्ये सदर रस्त्यावर दरड व माती पडण्याची घटना घडल्याची नोंद आहे. सद्य:स्थितीत या घाटमार्गातील संभाव्य दरड कोसळण्याच्या ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे दरडीचा भाग काढून घेणेत आलेला असुन सदर भाग सुरक्षित करण्यात आला आहे.

(३) विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत विठापेठ मलकापूर अणुस्कूरा साटवली पावस रस्ता रामा-१५० कि.मी १३३/४०० ते १६८/४०० मध्ये खराब लांबीची विशेष दुरूस्ती अंतर्गत १०.१२५ कि.मी. लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणाचे काम पूर्ण झाले आहे. सदय:स्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत चालू आहे. अणुस्कूरा घाटामध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजना करणेचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर घाटामध्ये Safety Audit करण्यात आले आहे. सदर अहवालात सुचविल्यानुसार रस्ता सुरक्षिततेसंबंधात आवश्यक त्या उपाययोजना निधीच्या अधीन राहून करण्यात आल्या आहेत.

हायब्रीड अन्युटी योजनेअंतर्गत विठापेठ मलकापूर अणुस्कूरा साटवली पावस रस्ता रामा-१५० किमी १३३/१०० ते १६८/१०० मध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम सध्यस्थितीत प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गोवळ डोंगर येथील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(२२) ६५३१३ (३०-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) गोवळ डोंगर पुलाची मागणी गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सन २००६ मध्ये पुलाला मंजूरी देऊन पूल उभारण्यात येणाऱ्या जागेचा सर्व्हे करुनही अद्यापपर्यंत पुलाच्या बांधकामास सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पूल नसल्यामुळे ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून होडीतून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर पूलाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१२-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पूलाच्या कामाकरिता प्राथमिक सर्व्हेक्षण अहवाल तयार करण्यात आला आहे.

(३) गोवळ व विल्ये या गावादरम्यान अर्जुना नदी असुन या दोन गावांदरम्यान पूल नसल्याने होडीने वाहतुक होत होती. परंतु गोवळ गावातून राजापूर मार्गे विल्ये गावाकडे बारमाही रस्त्याने सदय:स्थितीत वाहतुक सुरु आहे.

(४) सदर पुलाचे काम निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बळीरामपूर (ता,जि. नांदेड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेच्या सहशिक्षक यांच्याविरुध्द लाच घेतल्याचा गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत**

**(२३) ६५३३४ (२९-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती**

**सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बळीरामपूर (ता,जि. नांदेड) येथील राईट टू एज्युकेशन (आरटीई) अर्थात शिक्षणाचा अधिकारी कायद्यांतर्गत २५ टक्के कोटयातील प्रवेशासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेचे सह शिक्षक श्री.प्रल्हाद खुडे यांच्याविरुध्द लाच घेतल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड शहरातील एका तक्रारदाराच्या सहा वर्षीय मुलाला आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश अर्ज दाखल केल्यानंतर निवड झाली असून प्रतिनियुक्तीवर असलेले लाचखोर शिक्षक कागदपत्रे पडताळणी समिती,शिक्षण विभाग पंचायत समिती येथे कार्यरत होते त्यानुषंगाने त्यांनी नमूद कागदपत्रांमध्ये त्रुटी दर्शवून रक्कमेची मागणी केली होती हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२३-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या आरटीई २५% अंतर्गत प्रवेशासाठी सोडतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रे तपासणीकरिता नांदेड पंचायत समिती येथे पडताळणी समितीत सदस्यपदी नियुक्त शिक्षक श्री.प्रल्हाद खुडे यांनी तक्रारदाराच्या मुलाच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी दर्शवून रकमेची मागणी केल्याच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि ९.७.२०२३ रोजी गुन्हा नोंद करून संबंधित शिक्षकास अटक केली. संबंधित शिक्षकाची नियुक्ती प्राधिकारी संस्था असल्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.नांदेड यांनी संबंधित संस्थेचे अध्यक्ष,सचिव व मुख्याध्यापक यांना महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, अन्वये उचित कार्यवाही करण्याबाबत दि.११.५.२०२३ व दि. २३.५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये आदेशित करण्यात आले होते.संस्थेने जा. क्र. ०१/२०२३ दि. १९/०७/२०२३ रोजी संबधिताची सेवा निलंबित केली आहे.

---

## राज्यातील अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती व आश्वासित वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने मिळण्याबाबत

**(२४) ६५४५७ (०१-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये व तत्सम अशासकीय अभियांत्रिकी, औषध निर्माण आणि वास्तुशास्त्र अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या दिनांक १ एप्रिल, २०१० च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १२/२४ वर्षीय कालबद्ध व आश्वासित वेतनश्रेणी तसेच दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय असलेले १०/२०/३० या आश्वासित योजनेचे लाभ अद्यापपर्यंत मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लाभापासून अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तंत्र शिक्षण संचालनालयाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे नियमित महागाई भता, वार्षिक वेतन वाढ, वेतन आयोग, पदोन्नती, सेवानिवृत्ती व वैद्यकीय लाभ हे वेळोवेळी मिळत असताना सेवाअंतर्गत कालबद्ध पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, अनेक कर्मचारी गत बारा वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करून सुद्धा त्यांची १२/२४ वर्षाची वेतन निश्चिती न होता ते सेवानिवृत्त झालेले आहेत तसेच दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू झालेला असताना १०/२०/३० या आश्वासित वेतन निश्चितीचे लाभ देखील मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती व आश्वासित वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने लाभ मिळण्याकरिता वेगळा शासन निर्णय काढून कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही/उपायोजना केली वा करण्यात येत आहे.
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०९-०२-२०२४) :** (१), (२), (३) व (४)

वित्त विभागाच्या दिनांक १/४/२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना १२/२४ वर्षीय कालबध्द व आश्वासित वेतनश्रेणी लागू केलेली आहे. तसेच वित्त विभागाच्या ७ व्या वेतन आयोगाच्या दिनांक ३०/१/२०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार शासकीय कर्मचाऱ्यांना शासनाने दि. १/१/२०१६ पासून १०/२०/३० ही आश्वासित योजना लागू केलेली आहे. सदरच्या शासन आदेशामध्ये आश्वासित प्रगती योजना अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्याची तरतूद नसल्याने, त्यानुसार अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ देण्यात आलेला नाही.
(५) शासनाच्या दिनांक १८.१२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित पदवी व पदवीका संस्थेतील तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती व सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ पुर्वलक्षी प्रभावाने मंजूर करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**तळेवाडी (ता. राधानगरी, जि.कोल्हापूर) गावातून जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) ६५५५४ (२५-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेवाडी (ता.राधानगरी जि.कोल्हापूर) गावातून जाणारा दीड किलोमीटर लांबीच्या मुख्य रस्त्याचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम ग्रामस्थानी श्रमदानातून केले असून बारा वर्षापूर्वी त्यावर खडीकरण व डांबरीकरण झालेले असतांना काम प्रलंबित असून काम लवकरात लवकर होणेकरीता तेथील ग्रामस्थांनी याबाबत संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करुनसुध्दा अद्याप कामाला सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०२-०१-२०२४) :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी तालुक्यातील प्रजिमा-८७ पासून आटेगाव पैकी तळयाची वाडी रस्ता ग्रामा-८९ दर्जाचा असून रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. सदर रस्ता देखभाल दुरुस्तीकरीता जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अखत्यारित आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.कि.मी.०/०० ते

०/४०० या लांबीमध्ये जिल्हा परिषद बांधकाम विभाग, कोल्हापूर यांचेकडून रस्ता सुधारणा करणेचे रक्कम रु.३० लक्षचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन लवकरच काम कार्यान्वयीत करणेचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावर सा.क्र.कि.मी.०/४०० ते २/०० मध्ये रस्त्याच्या मजबूतीकरण व डांबरीकरणाचे रक्कम रु.९०.०० लक्षचे मंजूर काम सा.बां.विभागामार्फत प्रगतीत असून ऑगस्ट, २०२४ अखेर पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खडकवाला (जि.पुणे) येथील रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२६) ६५९२४ (२३-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला गावाच्या हद्दीतील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले मुख्य सिंहगड रस्त्याचे काम सुरु करण्यात येऊनही ते निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्यामुळे तेथे अपघात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय त्यानुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) सदरचे काम करारनाम्यातील तरतूदी प्रमाणे कार्यान्वयीन करण्यात येत असून माहे मार्च, २०२४ अखेर पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आयआयटी, एनआयटी व अन्य अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या जेईई-मेन परिक्षेबाबत**

**(२७) ६६१९६ (२९-०८-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयआयटी, एनआयटी व अन्य अभ्यासक्रमांच्या परिक्षेसाठी जेईई-मेन पात्रता परिक्षा घेतली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र या पात्रता परिक्षेसाठी शिक्षण मंडळाच्या १२ वी च्या परिक्षेत ७५ टक्के गुणाची अट ठेवण्यात आली आहे व ती अन्यायकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नॅशनल टेस्टींग एजन्सीने ही अट वगळावी याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०२-२०२४) :** (१) व (२) आयआयटी, एनआयटी आणि केंद्र शासनाकडून अनुदान देण्यात येत असलेल्या तांत्रिक व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील प्रवेशासाठी केंद्रिय शिक्षण मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या नॅशनल टेस्टींग एजन्सी कडून जेईई (मेन्स) परिक्षेचे आयोजन करण्यात येते.

सदर पात्रता परिक्षेसाठीची गुणवत्ता राखण्याच्या अनुषंगाने प्रवेशाकरीता खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी सायन्समध्ये ७५ टक्के तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना किमान ६५ टक्के गुण आवश्यक आहेत.

(३) सदरहू प्रवेश केंद्रीय स्तरावरील संस्थांमध्ये करण्यात येतात. या प्रवेश पात्रतेशी राज्य शासनाचा थेट संबध येत नाही. तसेच विद्यार्थ्यांकडूनही याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## पुणे येथील चांदणी चौकातील बाह्य नवीन सेवा रस्त्यावर विनापरवाना खोदकाम केल्याबाबत

**(२८) ६६२४९ (३१-०८-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील चांदणी चौकातील बाह्य नवीन सेवा रस्त्यावर विनापरवाना खोदाई केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनएचआयचे सल्लागार अभियंता यांच्या म्हणण्यानुसार या खोदकामासाठी एनएचआय कडून कुठलीही परवानगी अथवा विचारणा करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ता दीर्घकाळ सुस्थितीत राहण्याच्या नियमांचे उल्लंघन होत असल्यामुळे या रस्त्यांची दुरवस्था होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत एनएचआयने संबंधित बेकायदा खोद काम करणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध अद्याप कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदारावर कारवाई होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे,

पुणे येथील चांदणी चौकातील बाहय नवीन सेवा रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारित येतो. पुणे महानगर पालिकेकडून पाणी पुरवठा पाईप लाईनच्या वॉल्व्ह बसविण्यासाठी रस्त्याचे खोदकाम केले होते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

पाईपलाईनच्या वॉल्व्हचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता पूर्ववत करण्यात आला आहे.

(४) पुणे महानगर पालिकेने सदर काम अतितातडीचे असल्यामुळे विहित वेळेत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांची परवानगी घेणे शक्य झाले नसल्याचे कळविले आहे व पाणी पुरवठयाचे काम सार्वजनिक हितार्थ व अत्यावश्यक बाब असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील श्री संत ज्ञानेश्वर पालखी महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२९) ६६३२६ (३१-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील श्री संत ज्ञानेश्वर पालखी महामार्गावरील दौंडज खिंड ते नीरा, रस्त्याची दूरवस्था झाली असून बेलसर- उरुळीकांचन रस्त्यावरील शिंदवणे घाटमाथ्यावरील पुलाचे काम अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील श्री संत सोपानकाका पालखी मार्गातील लासुर्णे ते लालपुरी कळांब व

खाराओढा ते निरनिमगाव रस्त्याची दुरवस्था झाल्याने पायी दिडींला जाणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करुन सदर महामार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०१-२०२४) :** (१) श्री संत ज्ञानेश्वर पालखी महामार्गावरील दौंडज खिंड ते नीरा रस्त्यावर अवकाळी पावसाच्या पाण्यामुळे खड्डे पडले होते. पालखीच्या आगमनापूर्वी या भागातील सर्व खड्डे भरण्यात आले होते. सद्यस्थितीत सदर रस्ता वाहतुकीस योग्य आहे.

पुरंदर तालुक्यातील बेलसर-उरूळी कांचन रस्त्यावरील शिंदवणे घाटमाथ्यावरील पुलाचे काम माहे मे, २०२३ अखेर पूर्ण केले असून माहे जून, २०२३ पासून सदर पुल व रस्ता वाहतूकीसाठी खुला करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.

श्री संत सोपान काका पालखी मार्गा तील लासुर्णे ते लालपुरी कळंब व खाराओढा ते निर निमगांव रस्त्याची आवश्यक दुरुस्ती व सुधारणा करुन वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.
(३) जुलै, २०२३ च्या अर्थसंकल्पा मध्ये लासुर्णे कळंब पालखी मार्ग या लांबीतील रु.१०००.०० लक्ष रक्कमेचे काम मंजुर झाले असुन सदर काम निविदा स्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर मतदार संघातील शिधावाटप दुकानदारांच्या विविध समस्यांबाबत**

**(३०) ६६६३१ (३०-०८-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर मतदार संघात ४० फ उप शिधावाटप कार्यालय असून या कार्यालय अंतर्गत १०६ शिधावाटप दुकाने असून या दुकानदारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी बैठक लावण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री महोदय यांच्या कडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुकानदारांना दुकाने चालविणे दिवसेंदिवस खर्चिक आणि त्रासदायक असल्याने तसेच त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून त्यांच्यात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दुकानदारांच्या विविध समस्या सोडवण्याची मागणी जिल्हा कृती समिती, ठाणे जिल्हा यांनी सुद्धा मा.मंत्री महोदय यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२१-०२-२०२४) :** (१), (२), (३) व (४) नाही.

तथापि, उल्हासनगर शहर व तालुका रेशन शॉपओनर्स वेलफेअर असोसिएशन (रजि.) जि. ठाणे यांचे दि. २२.०५.२०२३ च्या निवेदनानुसार त्यांच्या मागण्यांसदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत दि. २८.११.२०२३ च्या पत्रान्वये सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व कायद्याच्या चौकटीमध्ये राहून राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून यथोचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देसई-बेलवड (ता.वाडा, जि.पालघर) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३१) ६६६६७ (३१-०८-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसई-तिलसे मार्गे बेलवड (ता.वाडा, जि.पालघर) रस्त्याची मागील १० वर्षांपासून दुरवस्था झाल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ होऊन प्रवाशांची गैरसोय होत असल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिकांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री,पालक मंत्री, पालघर, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वाडा, कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, पालघर यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी स्थानिकांनी आंदोलन केले असता उप अभियंता, श्री संजय डोंगरे यांनी दिनांक १५ एप्रिल, २०२३ पर्यंत काम करण्याचे आश्वासन दिल्याने सदर आंदोलन स्थगित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ मध्ये दिलेल्या आश्वासनानुसार कामाला सुरुवात झाली मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने स्थानिकांनी संघर्ष समितीच्यावतीने तहसीलदार, वाडा यांच्या कार्यालयासमोर निदर्शने करुन दिलेल्या आश्वासनाची योग्य पद्धतीने पूर्तता होत नसल्याने निवेदन देऊन तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२४) :** (१) सदर रस्त्याच्या दुरूस्तीकरिता निवेदने प्राप्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय,स्थानिकांनी संघर्ष समितीच्यावतीने निवेदन दिलेले आहे.

(४) सदर रस्त्यावर पूरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत रक्कम रु.४.२८ कोटीचे मंजूर काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर रस्त्यावर ९.५ कि.मी लांबीत रक्कम रु.६.७५ कोटीची डांबरीकरणाची कामे मंजूर आहेत. यापैकी ४.५ कि.मी. लांबीतील डांबरीकरणाची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ५ कि.मी लांबीतील प्रगतीपथावरील कामे मार्च २०२४ पर्यन्त पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जानेफळ (जि.बुलढाणा) येथील नवीन पालखी मार्गात गतिरोधक बसविण्याबाबत

**(३२) ६६९११ (३१-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जानेफळ (जि.बुलढाणा) येथील नवीन पालखी मार्गामुळे वाहने अधिक वेगाने जात असल्याने शिवाजी हायस्कूल, जिल्हा परिषद शाळा व सरस्वती विद्यालयासमोर असलेल्या मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिकांनी संबधितांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) तथापि, यापूर्वीच कामाच्या निकषानुसार जानेफळ येथील नवीन झालेल्या पालखी मार्गावर शाळेसमोर सुचना फलके, समोर शाळा असल्याचे फलक व त्याचप्रमाणे गती प्रतिबंधक फलक सुद्धा लावण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पलूस (जि. सांगली) तालुक्यातील पाचवा मैल रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ६६९७० (२३-०८-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलूस (जि.सांगली) तालुक्यातील पाचवा मैल येथील अर्धा किलोमीटर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अद्याप सुरु झाले नसल्याने वाहनधारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून अनेकदा लहान मोठे अपघात होत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त रस्त्यावर वाढत असलेले अपघात थांबविण्यासाठी रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३१-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर महामार्ग राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे आहे. या लांबीतील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे व या लांबीत अपघात झाल्याचे दिसून आलेले नाही.

(२) सदर लांबीमध्ये वन विभागाकडून अद्याप मंजूरी मिळाली नसल्यामुळे ६६० मीटर लांबीमध्ये काँक्रीटचे काम करण्यात आलेले नाही. या कामासाठी त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव मंजूरीसाठी महसूल व वन विभागास माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये सादर केलेला असून मंजूरीनंतर कॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रेशन दुकानात वापरणाऱ्या येणाऱ्या ई-पॉस मशीनबाबत

**(३४) ६६९८७ (३०-०८-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रास्तभाव दुकानामध्ये धान्य वितरण सुरुळीत होण्यासाठी २ जी नेटवर्कच्या पॉस मशीनचा वापर करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २ जी नेटवर्कच्या पॉस मशीनमधील तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांना वारंवार रेशन दुकानावर जावे लागते किंवा रेशन दुकानदारांना लाभार्थ्यांच्या घरी जाऊन ठसे घ्यावे लागत असून बऱ्याचदा रेशन दुकानदार लाभार्थ्यांना रेशनची पावती देत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यास्तव सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानांमध्ये नवीन ई-पॉस उपकरणे बसविण्याकरीता दिनांक ०१ जुलै, २०२२ रोजी वा त्या सुमारास निविदा प्रसिध्द करण्यात येऊन नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरीता ३ सिस्टीम इंटिग्रेटरची निवड करुन त्यांना कार्यादेश देण्याबाबतची कार्यवाही सुरू असून त्यानुसार ४ जी व आयरिस स्कॅनर हे तंत्रज्ञान असणाऱ्या मशीन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०५-०२-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे, लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानातील शिधावस्तुंचे वितरण करतांना लाभार्थ्यांची बायोमॅट्रिक ओळख पटवून २-G/३-G तंत्रज्ञान असलेल्या ई-पॉस मशीनद्वारे रास्तभाव दुकानांमध्ये शिधावस्तु वितरीत करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही, ई-पॉस मशिन मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास संबंधित सिस्टीम इंटिग्रेटर यांच्याकडून तात्काळ दुरूस्त करून देण्यात येते. तसेच NIC यांच्याकडील AePDS प्रणालीमध्ये तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास त्याबाबत NIC यांच्याकडून सदर तांत्रिक समस्याचे तात्काळ निराकरण करण्यात येते.

(३) होय खरे आहे, नवीन ई-पॉस मशीन बसविण्याकरीता ३ सिस्टीम इंटिग्रेटरची निवड करुन त्यांना दि.१९.१०.२०२३

रोजीच्या पत्रान्वये Letter of Intent (LoI) देण्यात आले आहे. त्यानुसार लवकरच रास्तभाव दुकानदारांना ४ जी व आयरिस स्कॅनर हे तंत्रज्ञान असणाऱ्या मशीन उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) ६७५१७ (०१-०९-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: भुसावळ, मुंबई येथील अंधेरी, साकीनाका, मालाड, कांदिवली येथे आरटीई प्रवेश नाकारल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरटीई प्रवेशाची सोडत जाहीर होऊन महिना होऊनही या सोडतीत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी ९४ हजार ७०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे, त्यापैकी ५३ हजार ९०४ विद्यार्थ्यांचेच प्रवेश झाले असून अद्याप ४० हजार ७९६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या पालकांची विविध शाळांकडून कागदपत्रांसाठी अडवणूक केली जात असून याप्रकरणी शिक्षण संचालनालयाने शाळांवर थेट कारवाईचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करुन सदर शाळांवर कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थ्यांचे प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-१२-२०२३) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशासंदर्भात शिक्षणाधिकारी स्तरावर सुनावणी घेऊन विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील बारदाना खरेदीबाबत**

**(३६) ६७७०४ (२४-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: बुलढाणा जिल्ह्यात बारदाना उपलब्ध नसल्याने सन २०२० मध्ये शेतकऱ्यांना हमी भावाने मका खरेदी करता आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मका खरेदी तातडीने करता यावा यासाठी शासनाकडून बारदाना उपलब्ध होत नसल्यास शेतकऱ्यांच्या पोत्यातच मका खरेदी करावा, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे ठिय्या आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आंदोलनाला सकारात्मक प्रतिसाद देत त्याचवेळी शेतकऱ्यांच्याच बारदानामध्ये मका खरेदीचा निर्णय घेतल्यामुळे बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मका खरेदी करण्यात आला, परंतु, अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या बारदानाचे पैसे मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आह काय,
(४) तसेच शासनाने शेतकऱ्यांच्या बारदानामध्ये किती क्विंटल मका घेण्यात आला असून, त्यापोटी शेतकऱ्यांना बारदानाची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२२-०२-२०२४) :** (१) सन २०२० मध्ये भरडधान्य खरेदीसाठी शासकीय बारदाना उपलब्ध न झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या बारदानात मका खरेदी करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) बुलढाणा जिल्ह्यात एकूण १,२९,१८१.५४ क्विंटल मका शेतकऱ्यांच्या बारदानात खरेदी करण्यात आला असून, त्यासाठी बारदानाच्या प्रत्यक्ष रोख रकमेऐवजी २,५८,३६३ नग बारदानाचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेंदोळा खुर्द (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे पुल बांधण्याबाबत

**(३७) ६७९५३ (३१-०८-२०२३). अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेंदोळा खुर्द (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील शेतीमधून हायवेच्या बायपासचे काम सहा महिन्यापासून सुरु असल्यामुळे तसेच नाल्यावरील पुल अरुंद असल्याने प्रवाशांची गैरसाय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरसोय टाळण्यासाठी या पुलाला समांतर दुसरा पूल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांना दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी वा सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२४) :** (१) व २) अंशत: खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून मोझरी बायपासचे ६.१० कि.मी. लांबीचे काम प्रगतीत असून यामध्ये कि.मी. १/०८९ येथे मंजूर छोटया पुलाची रुंदी (बॉक्स कल्व्हर्ट) कमी असल्याने वाहतूक सुरळीततेच्या दृष्टीने छोटया पुलाची रुंदी वाढविण्याबाबत शेंदोळे (खुर्द) (ता.तिवसा, जि.अमरावती ) ग्रामस्थांची मागणी होती. त्यास अनुसरुन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९.३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पुलाची रुंदी वाढविण्याबाबत निवेदन दिले होते.
(३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार छोटया पुलाची (बॉक्स कल्व्हर्ट) रुंदी वाढविण्याचा प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांना सादर करुन वाढीव रुंदीच्या पुलाची मान्यता घेण्यात आली असून त्यानुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड येथील रास्तभाव धान्य दुकानदारांच्या अडचणी सोडविण्याबाबत

**(३८) ६८३५८ (३०-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रास्त भाव धान्य दुकानदार संघटना, नांदेड यांनी रास्तभाव दुकानदारांच्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधितांकडे दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२१-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उक्त निवेदनामधील मागण्यांबाबत संबंधीताना दि.१३.११.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या दि.१९.०१.२०२४ व दि.२३.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अध्यक्ष, नांदेड जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार संघटना, नांदेड यांना परस्पर कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील केंद्राला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याबाबत**

**(३९) ६८३९७ (३०-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील तसेच द स्पेशल सेंटर फॉर नॅशनल सिक्युरिटी स्टडीज या केंद्राला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यासोबतच केंद्राचा विकास करण्यासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य शासनाकडे पाठविला आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमार सुरक्षा विषयक आणि युद्धनीतीच्या धोरणावर संशोधन होण्याच्या दृष्टीने द स्पेशल सेंटर फॉर नॅशनल सिक्युरिटी स्टडीज या केंद्रात कार्य करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यास केंद्रावर राज्य शासनाला प्राध्यापक आणि तज्ञ यांची नियुक्ती करण्याचे अधिकार राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सदर केंद्र विषयी शैक्षणिक धोरण, निर्णय घेण्यात राज्य सरकारचे मत विचारात घेतले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील द स्टडी सेंटर फॉर नॅशनल सिक्युरिटी स्टडीज या केंद्राला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देणेबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-०२-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) जवाहरलाल नेहरु विश्वविद्यालयाकडून सेंटर फॉर नॅशनल सिक्युरिटी स्टडीज मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चेअर स्थापना करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी करुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडीमध्ये नाशिक महामार्गावर नाल्यात रिक्षा पडून अपघात झाल्याबाबत**

**(४०) ६८४२६ (३१-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी मुंबई-नाशिक महामार्गावर ऑटोरिक्षा नाल्यात पडल्याने आई आणि मुलीसह एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला असून त्यात चार जण जखमी झाल्याचे दिनांक २ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाल्याच्या बांधकामाच्या ठिकाणी कोणतेही बॅरिकेड्स किंवा योग्य सिग्नल यंत्रणा, दिवे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जखमी चौघांनाही आयजीएम रूग्णालयामध्ये उपचाराकरीता दाखल करण्यात आले असून प्रशासन व शासनामार्फत मृत व जखमी कुटुंबीयांना कोणती मदत केली आहे तसेच यांस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर रस्ता हा केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो.
सदर नाल्याच्या बांधकामाच्या ठिकाणी भारतीय रस्ते महासभा यांचे मानकानुसार सुरक्षा उपाययोजना करण्यात आली होती.
(३) पोलीसांचे प्रथम खबरी अहवालानुसार सदरचा अपघात ऑटोरिक्षा भरधाव वेगात चालविल्यामुळे चालकाचा ऑटोरिक्षा वरील ताबा सुटल्यामुळे झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बरगवाडी/घुगेवाडी (ता.शिरुर(का.),जि.बीड) येथील रस्त्यावर पुल बांधण्याबाबत**

**(४१) ६८५५७ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा मतदारसंघामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम सुरु असून त्यादरम्यान बरगवाडी/घुगेवाडी (ता. शिरुर (का.) येथे रहदारीसाठी व सदर गावांना जोडण्यासाठी पुल बांधण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अहमदनगर-बीड-परळी रेल्वे बांधकाम चालू असलेल्या कार्यालयास व तेथील रेल्वे अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना सर्वेक्षण करुन येथे पुल बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना पत्र/निवेदन देऊन दिनांक २२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०१-०२-२०२४) :** (१) अहमदनगर बीड परळी रेल्वे मार्गाचे कामकाज सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत नसून सदर कामकाज रेल्वे विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.
तसेच बरगवाडी/घुगेवाडी (ता.शिरुर (का.) येथे रहदारीसाठी व सदर गावांना जोडण्यासाठी पुल बांधण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त नाही.
(२) स्थानिक लोप्रतिनिधी यांचे दि.२२.०५.२०२३ रोजीचे पत्र/निवेदन शासनास अप्राप्त आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील रस्ते व पुलांच्या कामांबाबत**

**(४२) ६८९१७ (३१-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील मंजूरी देण्यात आलेले रस्ते व पुलाच्या विकास कामांना शासनाकडून माहे जुलै,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ते हायब्रिड अन्युटी योजनेअंतर्गत करण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी दिनांक २९ नोव्हेंबर,२०२२ व माहे फेब्रुवारी,२०२३ मध्ये शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, काही रस्त्यांच्या कामांना सन २०२३ च्या अर्थसंकल्पात मंजूरी देण्यात आली त्याच अनुषंगाने उक्त तालुक्यातील रस्त्यांना हायब्रिड अन्युटी योजनेअंतर्गत मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

सा.बां.विभागाचे दि.०८/११/२०२३ च्या पत्रान्वये कामांवरील स्थगिती सरसकटपणे उठविण्यात आली असून सदर कामाकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करुन लवकरच कामे कार्यान्वयीत करणेचे नियोजन आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सोनेगाव लिगा लाडई NH-६ बाजारगाव शिवा अडेगाव प्रजिमा-१२ सा.क्र.कि.मी.०/०० ते ३०/०० लांबीमध्ये हायब्रीड अन्युईटी योजनेअंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम मंजूर आहे. सद्यस्थिती सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील (SH-१८) या रस्त्यावर अस्तित्वात नसलेल्या पुलांची व मोऱ्यांची दुरुस्ती कामांसाठी निधीचा अपहार केल्याबाबत**

**(४३) ७०६२१ (३१-०८-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील मोखाडा, खोडाळा, विहिगाव (SH-१८) या रस्त्यावर अस्तित्वात नसलेल्या पुलांची व मोऱ्यांची दुरुस्ती कामांसाठी सहा कोटी रुपयांचा शासकीय निधीचा अपहार केला असल्याची गंभीर बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) मोखाडा –खोडाळा –विहीगाव रामा ७२ या रस्त्यावर सन-२०२०-२१ मध्ये पुलांच्या पुर्नबांधणीकरिता रक्कम रु. ५.७३ कोटीची मंजूर कामे पूर्ण करण्यात आली असून रस्ता वाहतूकीकरिता सुस्थितीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचलेगाव निवळी खुर्द वालूर राजेवाडी ते राज्य मार्ग २३५ (प्रजिमा ३०) बलसा फाटा या प्रकल्पाची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करणेबाबत**

**(४४) ७०६७७ (३१-०८-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर अंतर्गत HAM तत्त्वावर बांधल्या जाणाऱ्या पाचलेगाव निवळी खुर्द वालूर राजेवाडी ते राज्य मार्ग २३५ (प्रजिमा ३०) बलसा फाटा किमी ०/०० ते राजेवाडी ते ३३/०७४ पॅकेज क्र. AU-११० या प्रकल्पाचे त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी (जिंतूर) सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांमध्ये बऱ्याच त्रुटी आढळून येत असल्याने प्रत्यक्ष कामाकरिता वापरलेला माल, साहित्य व कामावरील देखरेख इत्यादींबाबत शंका निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व

त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०९-०१-२०२४) :** (१) सदर निवेदन प्राप्त आहे.
(२) सदरचे काम हायब्रीड ॲन्युईटी योजने अंतर्गत सवलत करारनाम्यातील तरतूदी, निकष व मानकाप्रमाणे कार्यान्वयीत करण्यात आले आहे.
(३) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित मुख्य अभियंता यांचा अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घरगुती गॅस सिलेंडरची किंमत ठरविणेबाबत

**(४५) ७०८१० (३०-०८-२०२३). श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कुटुंबांना पुरविण्यात येणाऱ्या घरगुती गॅस सिलेंडर खरेदीसाठी रूपये ११०० हुन अधिक रक्कम आकारली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सामान्य कुटुंबाला इतकी रक्कम अदा करून घरगुती गॅस सिलेंडर खरेदी करणे परवडणारे नसल्याने राजस्थान शासनाप्रमाणे राज्यात घरगुती गॅस सिलेंडरची किंमत रूपये ५०० इतकी करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र राज्यात घरगुती गॅस सिलिंडरची किरकोळ विक्री किंमत रु.९००/- ते ९८०/- या दरम्यान आहे.
(२) घरगुती गॅस सिलिंडरची किंमत ५०० रुपये करण्याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करणे बाबत

**(४६) ७१०२८ (०१-०९-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समग्र शिक्षा अभियान (सर्व शिक्षा अभियान) या केंद्र सरकार पुरस्कृत शिक्षा अभियानात मागील २० वर्षांपासून असंख्य कर्मचारी कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचारी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रताधारक असून शासनाच्या प्रचलित नियमावली नुसारच त्या कर्मचाऱ्यांची नेमणूक झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कर्तुत्वावर शैक्षणिक निर्देशांकात महाराष्ट्र राज्य देशात क्रमांक १ चे राज्य म्हणून जाहीर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासंदर्भात व मानधनांमध्ये वाढ करण्यासंदर्भात वारंवार मागणी करूनही अद्याप पर्यंत त्यांना न्याय मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ओरिसा राज्याने सदर राज्यातील कंत्राटी कर्मचारी पद्धत बंद करून ५७ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, ओरिसा राज्याप्रमाणेच शासनही याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत निर्णय घेणार आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०१-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच समग्र शिक्षा (सर्व शिक्षा अभियान) अंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवानियमावली, १९९४ नुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती मानधन तत्वावर करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती मानधन तत्वावर करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या मानधन वाढीच्या प्रस्तावावर शासनाने मंजूरी दिलेली आहे.

---

## द्राक्ष व बेदाण्याचा समावेश शालेय पोषण आहारात करणेबाबत

**(४७) ७१०३१ (०१-०९-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) द्राक्ष व बेदाण्याचा समावेश शालेय पोषण आहारात करण्याबाबत मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी मुंबई येथील बैठकीत माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर, सांगली, नाशिक यासह अनेक जिल्ह्यात द्राक्ष उत्पादक शेतकरी असून बेदाणा निर्मिती करण्यात महाराष्ट्र अग्रस्थानी असल्याने शालेय पोषण आहारात बेदाण्याचा सामावेश केल्यास द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, द्राक्ष व बेदाणाची २५ हजार कोटींची उलाढाल होत असून त्यांना ५ हजार कोटींचे परकीय चलन मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्याप्रमाणे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते त्याप्रमाणे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, शालेय पोषण आहारात बेदाण्याचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (०४-१२-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
संकेत टाईम्स या वृत्तपत्रामध्ये दि.१६ जून, २०२३ रोजी याबाबतची बातमी प्रसिध्द झाली होती.
(३) पणन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात देशास द्राक्ष निर्यातीमधून रु.२५४३४२.१४ लक्ष इतके परकीय चलन प्राप्त झाले आहे.
(४) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कृषि विभागाची स्वतंत्र योजना नसल्याचे कृषि विभागाने कळविले आहे.
(५) प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनेंतर्गत आठवडयातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना पुरक आहार म्हणून फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा, लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे इ. स्वरुपात नियमित आहाराव्यतिरिक्त पुरक आहार देण्यात येतो.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेडगाव-वडनेरभैरव (जि.नाशिक) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) ७११५० (३०-०८-२०२३). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील तीन तालुक्यांना जोडणा-या खेडगाव-वडनेरभैरव रस्त्याची १४ वर्षांपासून दुरुस्ती न झाल्याने रस्त्याची दुरवस्था होऊन प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे दिंडोरी व निफाड तालुक्यात जाण्यासाठी नागरिकांना गोंडेगावमार्गे मोठा फेरा घालून जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधितांनी विभागाकडे पाठपुरावा केला असता निधी नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रस्त्याकरीता तात्काळ निधी उपलब्ध करून देऊन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२०-०२-२०२४) :** (१) सदर रस्त्यावर वेळोवेळी खड्डे भरुन रस्ता वाहतूकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.
(२) नाही.
(३) व (४) सदर रस्त्यावर ४.५० कि.मी. लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरणाचे रक्कम रु.२५० लक्ष चे मंजूर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १९.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले असून विहित मुदतीत काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड विधानसभा मतदार संघामधील मांजरसुंबा-लिंबागणेश-पाटोदा रस्त्याच्या कामामुळे नागरीकांचे नुकसान झाल्याबाबत**

**(४९) ७१४९९ (२८-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा मतदारसंघातील मांजरसुंबा-लिंबागणेश-पाटोदा या रस्त्याचे काम संबंधित विभागाच्या वतीने करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोरगाव ग्रामपंचायत अंतर्गत जाधववस्ती येथे यापूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे तेथील शेतकऱ्यांच्या शेतात व घरामध्ये पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तेथील नागरिकांचे नुकसान टाळण्यासाठी सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस नालीचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे, राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी, मांजरसुबा ते चुंबळीफाटा रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ शिबीर कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयामार्फत करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही, महामार्गाच्या कामामुळे जाधववस्ती येथील शेतकऱ्यांच्या शेतात अथवा घरामध्ये अतिवृष्टीमुळे पावसाचे पाणी गेलेले नाही.
(३) होय, दोन वेळा पत्रव्यवहार केलेला आहे.
(४) मौजे मोरगाव ग्रामपंचायत अंतर्गत जाधववस्ती या ठिकाणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रधिकरणाचे अभियंता (Authority's Engineer) व कंत्राटदाराचे प्रतिनिधी यांनी पहाणी केली असता असे निदर्शनास आले की, रस्त्याच्या दोन्ही बाजुस निविदा शर्तीनुसार तयार करण्यात आलेल्या Earthen Drain मध्ये नागरिकांनी महामार्गावरुन ये-जा करण्यासाठी नालीमध्ये मातीचा भराव टाकुन रहदारीसाठी रस्ता तयार केला होता. अशा ठिकाणी पावसाळयात पाणी साचत होते. याबाबत संबंधित कंत्राटदार मे.मधुकॉन-श्रीहरी-हुले (जेव्ही), पाटोदा यांना पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य त्या उपाय योजना करण्यास्तव सुचना देण्यात आलेल्या होत्या, त्यानुसार कंत्राटदार यांनी पाण्याचा निचरा

होण्यासाठी आवश्यक त्या मागणी केलेल्या ठिकाणी पाईप टाकलेले आहेत. तसेच ज्याठिकाणी निविदेप्रमाणे (Schedule-B) मंजुर बांधीव गटारीचे (Built-up drain) काम पुर्ण करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील ट्रॉमा केअर सेंटर सुसज्ज ठेवण्याबाबत**

**(५०) ७१६०१ (०१-११-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यशवंतराव चव्हाण पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर दिनांक १३ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास टँकरला आग लागून सहा जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुर्घटनेतील जखमींना तसेच महामार्गावरील अपघातात होणाऱ्या जखमींना पुणे -मुंबई द्रुतगती मार्गावर असलेल्या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये एक डॉक्टर आणि एक कर्मचारी असल्याने अपघातातील जखमींवर उपचार करण्यास दिरंगाई होत असल्याने जखमींना खाजगी दवाखान्यात दाखल करावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ट्रॉमा केअर सेंटरमध्ये साधन सामग्री अभावी योग्य उपचार मिळत नसल्याने जखमींना प्राण गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई- पुणे द्रुतगती टोल करामध्ये वाढ करण्यात येऊन देखील प्रवासाकरीता अद्ययावत सुसज्ज ट्रामा केअर व इतर सोयीसुविधांचा अभाव असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त द्रुतगती मार्गावरील होणाऱ्या अपघातग्रस्तांचे प्राण वाचविण्याकरीता ट्रॉमा केअर सेंटर अद्यावत उपकरणांसह सुसज्ज ठेवण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२८-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावरील टोलमध्ये दिनांक ०१.०४.२०२३ पासून १८ टक्के वाढ करण्यात आली, हे खरे आहे.
परंतु, वाढत्या टोलच्या तुलनेत महामार्गावर अद्यावत सुसज्ज ट्रॉमा केअर व इतर सोई सुविधांचा अभाव असल्याची बाब उघडकीस आली आहे, हे खरे नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.